माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) / जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ उपसंपादक/ जनसंपर्क अधिकारी गट -अ (कनिष्ठ) संवर्गात सरळसेवेने नियुक्ती करणे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.माजम-२००८/प्र.क्र.५४/०८/३४-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३ जुलै, २००८

संदर्भ : शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्र.८२/२००१/मसेआ-२०००/ प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५.५.२००१

शासन निर्णय :

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) / जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ उपसंपादक / जनसंपर्क अधिकारी गट-अ (कनिष्ठ) या संवर्गातील पदावर सरळ सेवेने नियुक्ती करण्यासाठी स्थापन केलेल्या निवड समितीने, निवड केलेल्या खालील उमेदवारांची पुढे नमूद केलेल्या बाबींची पूर्तता होण्याच्या अधीन राहून रु.७४५०-२२५-११५०० या वेतनश्रेणीत परिवीक्षाधीन नियुक्ती करण्यात येत आहे.

१.	श्रीमती जोगळेकर मीनल शशिकांत (महिला आरक्षण)(खुला)	
२.	श्रीमती मोहरील किर्ती प्रकाशराव (महिला आरक्षण)	(खुला)
३	श्रीमती आंधळे वर्षा संतोष (महिला आरक्षण)	(खुला)
४	श्री.गांगुडे किशोर रमेश	(अ.जा)
५.	श्रीमती खैरनार पूर्णिमा जगन्नाथ	(अ.जा)
६	श्री.बागुल हेमराज काशीनाथ	(इ.मा.व)
७	श्री.पाटील देवेंद्र लक्ष्मण	(इ.मा.व)
८	श्री.टाके प्रविण कृष्णराव	(इ.मा.व)

.....२/-

२. वरील उमेदवारांच्या पदस्थापना महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांनी पुढील बाबींची पूर्तता होण्याच्या अधीन राहून कराव्यात :-

(१) मागासवर्गीय उमेदवारांची जाती प्रमाणपत्रे पडताळणीची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक राहील.

(२) वरील उमेदवारांचे शिक्षण, वय, अनुभव, जाती प्रमाणपत्र इत्यादी बाबतची मूळ प्रमाणपत्रे तपासणे आवश्यक राहील.

(३) खुला प्रवर्ग, अनुसूचित जाती व्यतिरिक्त इतर सर्व आरक्षणाच्या उमेदवारांचे उन्नत व प्रगत गटांमध्ये मोडत नसल्याचे (नॉन क्रिमी लेअर) प्रमाणपत्र तपासून घेणे आवश्यक राहील.

(४) वरील उमेदवारांची नियुक्ती पूर्व चारित्र्याची पडताळणी होण्याच्या अधीन राहून करण्यात आलेली आहे. पूर्व चारित्र्याची पडताळणीची कार्यवाही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या स्तरावर करण्यात यावी.

(५) वरील उमेदवारांची वैद्यकिय तपासणी करण्यात यावी.

(६) वरील उमेदवारांच्या नियुक्त्या पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास पूर्वसूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

३. वरील उमेदवार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वरील संवर्गातील पदांवर दोन वर्षाच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन अधिकारी म्हणून कार्यरत असतील. पदस्थापनेचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यांच्या आत त्यांनी संबंधित पदावर नियुक्ती स्विकारणे आवश्यक आहे. विहित मुदतीत नियुक्ती न स्वीकारल्यास निवडसूचीवरील त्यांच्या गुणवत्ताक्रमानुसार अनुज्ञेय असलेली संवर्गातील ज्येष्ठता त्यांना मिळणार नाही. तसेच प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांच्याकडून वरील मुदतीत काहीही कळविण्यात न आल्यास निवड यादीवरील त्यांचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता काढून टाकण्यात येईल. नियुक्ती स्विकारण्यासाठी करावा लागणारा प्रवास खर्च त्यांना स्वत:लाच सोसावा लागेल.

४. परिवीक्षाधीन काळात संबंधित अधिकाऱ्यांनी शासकीय अधिकाऱ्यांसाठी विहीत केलेल्या मराठी व हिंदी भाषा परिक्षा, जर ते त्या परीक्षामध्ये यापूर्वीच उत्तीर्ण झालेले नसतील तर किंवा त्यांना अशा परीक्षेत उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.

५. एखाद्या परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांचे काम परिवीक्षाधीन काळात अपेक्षित दर्जाचे आढळले नाही किंवा त्याची वर्तणूक समाधानकारक किंवा गट-अ दर्जाच्या अधिकाऱ्यास शोभेल अशी न आढळल्यास त्याला सेवेतून कमी करण्यात येईल.

६. वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) / जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ उपसंपादक / जनसंपर्क अधिकारी गट-अ (कनिष्ठ) या संवर्गात सरळ सेवेने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांची ज्येष्ठता गुणानुक्रमानुसार स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

७. वर नमूद केलेल्या शर्ती व्यतिरिक्त सर्वसाधारणपणे राज्य सेवा गट-अ (कनिष्ठ) च्या अधिकाऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने विहित केलेले इतरही सेवा नियम या उमेदवारांना लागू असतील व त्या नियमांचे पालन करणे त्यांना बंधनकारक राहील.

८ हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा संगणक सांकेतांक **२००८०७०३१३२६१५००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही /-
(आ न वसावे)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
राज्यमंत्री (माहिती व जनसंपर्क) यांचे स्वीय सहायक. मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल १ (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती) (प्रशासन) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
उपसंचालक (लेखा) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
सर्व संबंधित उमेदवार (माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत)
सामान्य प्रशासन विभाग, का.क्र. १२,१६-ब, व ३४,
निवड नस्ती.